# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पुर्व) मुंबई — ४०० ०९३
दुरध्वनी क्र. ०२२-४७४८८३१२ / ४७४८४६९९ /४७४८४६७९ ईमेल :gmhrrecruitment@midcindia.org
मदत केंद्र क्र.: ०२२-४८२५६४३८/३९ संकेतस्थळ - www.midcindia.org
(वेळ सकाळी १०.३० ते सायं ५.३०)
सुचनापत्र क्रमांक — ०१/२०२३

---

## सरळसेवा भरती २०२३

## अतिरिक्त परीक्षा शुल्क परताव्याबाबत सुचनापत्र

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. १४/०८/२०२३ रोजी सरळसेवा भरतीसाठी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने दि. ०२/०९/२०२३ पासून ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमध्ये खुला प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. १०००/- अधिक रु.१८०/- GST रक्कम असे एकूण रु. ११८०/- तसेच, मागासवर्गीय/ आर्थिक दुर्बल घटक / अनाथ / दिव्यांग या प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. ९००/- अधिक रु. १६२ GST रक्कम असे एकूण रु.१०६२/- इतकी रक्कम आकारण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं१२२३/प्र.क्र.१४/का.१३-अ, दि. १४ फेब्रुवारी, २०२३ अन्वये, स्पर्धा परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेताना कंपन्यांना द्यावयाची रक्कम, कर व प्रशासकीय खर्च मिळून प्रति उमेदवार रु. १०००/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात यावे व या परीक्षा शुल्कात राखीव प्रवर्गासाठी १० % सवलत देण्यात यावी असे निर्देश दिलेले आहेत.

ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमध्ये खुला प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. १८०/- व मागासवर्गीय/ आर्थिक दुर्बल घटक / अनाथ / दिव्यांग या प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. १६२/- इतकी अतिरिक्त रक्कम आकारण्यात येत आहे. याबाबत ऑनलाईन स्पर्धा परीक्षा घेणा-या संस्थेशी संपर्क केला असता, त्यांनी सद्यस्थितीमध्ये आकारण्यात येणा-या अतिरिक्त रक्कमेबाबत बदल करावयाचा झाल्यास अर्ज भरावयाच्या लिंकमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यामध्ये काही तांत्रिक अडचण निर्माण होऊ नये म्हणून ऑनलाईन अर्ज सादर करण्याची विहित मुदत संपल्यानंतर उमेदवारांकडून महामंडळाकडे जमा झालेली अतिरिक्त GST रक्कम संबंधित उमेदवारांच्या बँक खात्यामध्ये जमा करणेबाबतचा सल्ला सदर संस्थेने दिला आहे. त्यानुसार अर्ज सादर करणा-या उमेदवारांकडून महामंडळाकडे जमा झालेली / होणारी अतिरिक्त GST रक्कम अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर (दि.२५/०९/२०२३ नंतर) एक महिन्यामध्ये संबंधित उमेदवारांनी ज्या बँक खात्यातून रक्कम अदा केलेली आहे, त्याच बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत
(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

स्थळ :- मुंबई
दिनांक :- ०६/०९/२०२३